**MAHARASHTRA AGRICULTURAL UNIVERSITIES EXAMINATION BOARD**
**महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ**

Azadi Ka Amrit Mahotsav

MCAER Building, 132/B, Bhosalenagar, Pune – 411 007
020-25528519/119 https://www.mcaer.org/maueb.html E-mail: mauebpune@yahoo.co.in

जा.क्र. मकृविपमं/आपसाप्रप-२३/७१३/२३ दिनांकः ०७/०८/२०२३

## प्रसिध्दीसाठी बातमी

महाराष्ट्रातील चारही कृषि विद्यापीठांमध्ये उपलब्ध असणा-या विविध विद्याशाखांमध्ये **शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ साठी "आचार्य पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी सामाईक प्रवेश परीक्षा-२०२३ (Ph.D-CET-2023)"** महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे यांचे मार्फत संभाव्य दि. २९.१०.२०२३ रोजी महाराष्ट्रातील सहा केंद्रांवर आयोजित करण्यात येत आहे.

सदर परीक्षेसाठी संबंधित विद्याशाखेचे पदव्युत्तर विद्यार्थी तसेच, सन २०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षाच्या अंतिम सत्र परीक्षेस बसणारे विद्यार्थी पात्र राहतील. सदर परीक्षेसाठी विहित नमुन्यातील अर्ज महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांचे **http://www.mcaer.org** या संकेतस्थळावर स्वतः भरावयाचे आहे. अर्ज भरण्यापूर्वी संपूर्ण माहितीपत्रक काळजीपूर्वक वाचणे अत्यावश्यक आहे. ऑनलाईन अर्ज (Online Application) भरण्याचा कालावधी **दि.०८.०८.२०२३ ते दि.२३.०८.२०२३** असा राहील.

ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर परीक्षा शुल्क ऑनलाईन बॅकींग (नेट बॅकींग) डेबिट/क्रेडीट कार्डव्दारे **दि.०९.०८.२०२३ ते दि.२४.०८.२०२३** (दुपारी १५:००) पर्यंत स्वीकारले जाईल. ह्या परीक्षेसंबंधित अर्ज महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे यांच्याकडे पाठविण्याची आवश्यकता नाही.

संभाव्य पात्र व अपात्र उमेदवारांची तात्पुरती यादी **दि.३१.०८.२०२३** रोजी संकेतस्थळावर उपलब्ध होईल. पात्र उमेदवारांनी आपले 'परीक्षा प्रवेश पत्र' सदरील संकेतस्थळावरुन **दि.१७.१०.२०२३** पासून प्रिंट काढून उपलब्ध करुन घ्यावयाचे आहेत.

सदर सामाईक प्रवेश परीक्षेचा परीक्षेचा निकाल संभाव्य **दि.०८.११.२०२३** रोजी महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांचे **http://www.mcaer.org** या संकेतस्थळावर उपलब्ध राहील. तसेच, सदर परीक्षेच्या वेळापत्रकात काही बदल झाल्यास तसे संबंधित संकेतस्थळावर अधिसुचित करण्यात येईल. या संदर्भात अधिक माहितीसाठी **०२०-२५५२८५१९/ ०२०-२५५२८११९** या दुरध्वनी क्रमाकांवर संपर्क साधावा, असे नियंत्रक, महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे यांचे कार्यालयाव्दारे कळविण्यात आलेले आहे.

दिनांक : ०७.०८.२०२३
स्थळ : पुणे

**नियंत्रक**
**महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे**